चाळीस तिजोऱ्या

ईराणी लोककथा

लेखक: ॲरन शेफर्ड

चित्रे: ॲलिशर डायानोव्ह

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन







कोण्या एके काळी, ईराणची राजधानी *इस्फहान* या शहरात *अहमद* नावाचा एक तरूण राहात होता. त्याच्या पत्नीचे नाव *जमैल* होते. त्याच्यात हस्तव्यवसाय किंवा धंदा करण्याचे कौशल्य नव्हते. पण त्याच्याकडे एक फावडा आणि एक कुदळ होती. तो आपल्या पत्नीला म्हणत असे, “एखादा माणूस जर खड्डा खोदू शकतो तर तो आपलं पोट भरण्यासाठी पैसासुद्धा कमावू शकतो.”

पण त्याच्या या बोलण्याने जमैलचे समाधान होत नसे.



एकदा जमैल नेहमीसारखं गरम पाण्याने स्नान करायला आणि इतर स्त्रियांशी गप्पा मारायला सार्वजनिक स्नानगृहात गेली. पण तेथील सुरक्षारक्षक बाई तिला म्हणाली, “तू आत जाऊ शकत नाहीस. बादशहाच्या राजज्योतिषाची पत्नी आत आहे आणि तिने पूर्ण स्नानगृह स्वत:साठी घेतलंय.”

“समजते काय ती स्वत:ला?” जमैल निषेध व्यक्त करत म्हणाली. “तिचा नवरा भविष्य सांगत फिरतो म्हणून!”

घरी परतण्याशिवाय तिच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. मनातल्या मनात ती संतापाने धगधगत होती.

संध्याकाळी, अहमदने तिच्या हातात दिवसभराची कमाई सोपवली. ती म्हणाली, “एवढेच पैसे! याच्यावर जास्त दिवस नाही काढता यायचे. उद्या तुम्ही बाजारात जाऊन बसा आणि लोकांना त्याचं भविष्य सांगायचं काम सुरू करा.”

“जमैल, वेडी झालीयस का तू?” अहमद चमकून म्हणाला. “भविष्य सांगायचं ज्ञान माझ्याकडे कुठाय?”

“ज्ञान असायची काही गरज नाही तुम्हाला,” जमैल म्हणाली. “कुणी तुमच्याकडे समस्या घेऊन आलं तर फक्त फासे टाकायचे आणि शहाणपणाचे काही बोल पुटपुटायचे. असं केलं नाहीत तर मी माझ्या बाबांच्या घरी राहायला जाईन.”

पुढल्या दिवशी अहमदने त्याचा फावडा-कुदळ विकून टाकले आणि भविष्याचा फलक-फासे तसेच ज्योतिष्याचा पोशाख विकत आणले. मग तो बाजारात सार्वजनिक स्नानगृहानजिक जाऊन बसला.



त्याने तिथे बैठक मारली तेवढ्यातच बादशहाच्या एका मंत्र्याची पत्नी पळत पळत त्याच्याकडे आली.

“ज्योतिषीबुवा, मला मदत करा. आज मी माझी सर्वात मौल्यवान अंगठी घालून स्नानघरात गेले आणि नेमकी ती हरवली. कृपा करून मला सांगा, माझी अंगठी कुठे मिळेल?”

अहमदने आवंढा गिळला आणि फासा टाकला. तो काही पुटपुटायचा विचार करणार इतक्यातच त्याची नजर त्या बाईच्या बाहीवर गेली. त्याला एक भोक पडले होते आणि त्यातून त्या बाईच्या हाताचा थोडासा भाग दिसत होता.

एका सन्माननीय स्त्रीला हात असा उघडा टाकणे शोभनीय नव्हते. त्यामुळे अहमद पुढे झुकून कुजबुजला, “बेगमसाहेब, मला एक भोक दिसतंय.”

“काय दिसतंय?” बाईने जवळ सरकून विचारले.

“भोक! भोक!”


बाईचा चेहरा उजळला. “बरोबर, भोक.”

ती बाई पुन्हा स्नानघराकडे पळाली आणि तिने तेथील भिंतीत असलेले भोक शोधले. त्यातच तिने आपली अंगठी दडवून ठेवली होती. ती लगेच पुन्हा अहमदकडे आली.

“अल्लाची कृपा!” ती म्हणाली. “तुम्हाला बरोबर कळलं अंगठी कुठे होती ते!” आश्चर्याने स्तब्ध झालेल्या अहमदला तिने एक सोन्याचे नाणे दिले.







संध्याकाळी जमैलने सोन्याचे नाणे बघितले आणि सारी कहाणी ऐकली. ती म्हणाली, “बघितलंत? किती सोप्पंय हे काम!”

“अल्लाची मेहरबानी झाली आज,” अहमद म्हणाला. “पण परत असं दु:साहस करायची इच्छा नाही माझी.”

“मूर्खासारखं बोलू नका,” जमैल म्हणाली. “तुमचं माझ्यावर प्रेम असेल तर उद्या पुन्हा तुम्हाला बाजारात जावं लागेल.”

त्या रात्री बादशहाच्या महालातील शाही खजिन्यात चोरी झाली. चाळीस तिजोऱ्यांमधील सोने आणि जवाहिरे चोरांनी लुटून नेले.

सकाळी बादशहाला चोरीची वार्ता देण्यात आली. “माझ्या राजज्योतिष्याला आणि त्याच्या सहकाऱ्यांना माझ्याकडे आणा,” त्याने हुकूम सोडला.

राजज्योतिषी आणि त्याचे सहकारी फासे टाकून काहीतरी पुटपुटले. पण त्यांच्यातील कुणीही चोराचा ठावठिकाणा सांगू शकले नाहीत.

“ढोंगी आहात सगळे!” बादशहा ओरडला. “कैदेत टाका यांना!”





बादशहाने एका ज्योतिषाबद्दल नुकतेच ऐकले होते. त्या ज्योतिष्याने एका मंत्र्याच्या पत्नीच्या हरवलेल्या अंगठीचा ठावठिकाणा अचूक सांगितला होता. अहमदला आणण्यासाठी बादशहाने दोन सेवकांना बाजारात पाठवले. अहमद थरथर कापत बादशहासमोर हजर झाला.

“ज्योतिषी महाशय,” बादशहा त्याला म्हणाला, “चाळीस तिजोऱ्यांमधील माझा खजिना चोरांनी लुटून नेलाय. त्या चोरांबद्दल तुम्ही काय सांगू शकाल?”

चाळीस तिजोऱ्या न्यायला चाळीस माणसं, असा तर्क अहमदने केला. “शहेनशहा, मी हे सांगू शकतो की चाळीस चोरांनी ही चोरी केली आहे.”



“आश्चर्य आहे!” बादशहा म्हणाला. “माझ्या राजज्योतिषांना हे सांगता आलं नाही. पण आता तुम्हाला माझा खजिना आणि चोर यांचा ठावठिकाणा शोधून काढावा लागेल.”

अहमद घाबरला. “मी....पूर्ण प्रयत्न करीन, बादशहा सलामत. पण त्याला थोडा वेळ लागेल.”

“किती वेळ?” बादशहाने विचारले.

“अं....चाळीस दिवस, शहेनशहा,” जास्तीत जास्त दिवस मिळतील असा अंदाज लावत अहमद म्हणाला. “प्रत्येक चोरासाठी एक दिवस.”

“म्हणजे बरेच दिवस लागतील!” बादशहा म्हणाला. “ठीकाय, तुम्हाला चाळीस दिवस देतो. तुम्ही य़शस्वी झालात तर तुम्हाला भरपूर धनदौलत मिळेल. पण नाही झालात तर तुम्हीसुद्धा इतरांसारखंच कैदेत सडत राहाल.”



घरी परतून अहमदने जमैलला सारे काही सांगितले, “बघ, कोणत्या संकटात टाकलंस तू आपल्याला? चाळीस दिवसांनंतर बादशहा मला कैदेत टाकेल.”

“मूर्खासारखं बोलू नका,” जमैल म्हणाली. “तिजोऱ्या शोधायचं काम करा. अंगठी कशी शोधलीत तसंच, काय?”

“एक सांगतो, जमैल, अंगठी मी शोधून काढली नव्हतीं. अल्लाच्या कृपेनं मिळाली ती. पण यावेळी काही आशेचा किरण दिसत नाहीये.”


अहमदने काही सुकलेले खजूर घेतले. त्यांतील मोजून चाळीस खजूर त्याने एका भांड्यात ठेवले. “रोज संध्याकाळी मी यातला एक खजूर खाईन. त्यावरून माझे चाळीस दिवस कधी संपतील हे मला कळू शकेल.”





गोष्ट अशी होती की बादशहाचा एक सेवक त्या चाळीस चोरांमधील एक चोर होता. अहमद आणि बादशहामध्ये झालेले बोलणे त्याने ऐकले होते. त्याच संध्याकाळी तो लगेच चोरांच्या अड्ड्यावर गेला आणि त्यांच्या सरदाराला त्याने ही खबर दिली. “एक ज्योतिषी आहे. तो आपला आणि आपण चोरलेल्या खजिन्याचा शोध चाळीस दिवसांत लावणार म्हणतोय.”

“मूर्ख बनवतोय तो,” सरदार म्हणाला. “पण आपण धोका पत्करता कामा नये. तू वेष बदलून त्याच्या घरी जा आणि काही माहिती मिळते का बघ.”



सेवक अहमदच्या घराच्या छतावर लपून बसला आणि अहमद आणि त्याच्या पत्नीच्या गप्पा ऐकू लागला. अहमदने भांड्यातून एक खजूर बाहेर काढला आणि खाल्ला. मग तो जमैलला म्हणाला, “हा पहिला.”





पुढल्या रात्री, सेवक आणखी एका चोरासोबत अहमदच्या घराच्या छतावर लपून बसला. ते अहमदचे बोलणे ऐकू लागले. अहमदने भांड्यातील दुसरा खजूर खाल्ला आणि म्हणाला, “हा दुसरा.”

दोघे चोर भयभीत होऊन तिथून पळाले आणि सरदाराकडे परतले. “आम्ही दोघं छतावर आहोत, हे त्याला कळलं.” सेवक म्हणाला. “तो म्हणाला, हा दुसरा.”

“असं होऊच शकत नाही!” सरदार म्हणाला.

छतावर बसलेला चोर सेवक एवढा घाबरला की छतावरून पडता पडता वाचला. तो घाईघाईत अड्ड्यावर परतला आणि सरदाराला खबर दिली. “या ज्योतिष्याकडे अद्भूत शक्ती आहे. मला न बघताच त्याला मी छतावर लपून बसल्याचं कळलं. मी स्वत: ऐकलं. तो म्हणाला, हा पहिला.”

“तुझ्या मनाचे खेळ आहेत,” सरदार म्हणाला. “उद्या दोन जण त्याच्या घरी जा.”







मग पुढल्या रात्री, सरदाराने तीन चोरांना पाठवले आणि त्याच्या पुढल्या रात्री चार, मग पाच.

असं करता करता चाळीसावी रात्र आली. सरदार म्हणाला, “आज तुमच्यासोबत मीसुद्धा येतो त्या ज्योतिष्याच्या घरी.”



सर्व चाळीस चोर अहमदच्या घराच्या छतावर चढून लपून बसले. निराश झालेल्या अहमदने भांड्यातून शेवटचा खजुर काढला आणि तो खाऊन टाकला. “हा चाळीसावा. संख्या पूर्ण झाली.”

जमैल त्याच्या शेजारी बसली. “अहमद,” ती हळुवार आवाजात म्हणाली, “तुम्हाला ज्योतिषी बनायला सांगून मी चूक केली. तुम्ही जसे आहात तसेच ठीक आहात. तुम्हाला काही वेगळं बनवायचा प्रयत्न उगाच केला मी. मला माफ कराल?”

“मी माफ केलंय तुला, जमैल. पण चूक माझीसुद्धा आहे. जी गोष्ट करणं योग्य नाही हे माहीत होतं, ती गोष्ट मी केली. पण आता काही उपयोग नाही या सगळ्याचा.”



तेव्हाच कुणीतरी दारावर मोठ्याने ठकठक केली.

अहमदने उसासा टाकला. "बादशहाचे शिपाई आले वाटतं!" दाराची कडी उघडत तो मोठ्याने म्हणाला. "ठीकाय! ठीकाय, तुम्ही कशासाठी इथे आलायत ते माहितीय मला."


त्याने दरवाजा उघडला. पण तो आश्चर्यचकीत झाला. दारात चाळीस चोर गुडघे टेकून, मान झुकवून बसले होते.

"तुम्ही तर ज्ञानी आहात, थोर ज्योतिषी महाशय!" सरदार म्हणाला. "तुमच्यापासून काही लपू शकत नाही. आमची विनंती आहे की बादशहाला आमच्याबद्दल काही सांगू नका."

अहमद आश्चर्याने थक्क झाला. ते चोर आहेत, याची त्याला खात्री पटली. त्वरीत विचार करून तो म्हणाला, "ठीकाय, नाही सांगणार. पण त्याबदल्यात तुम्ही चोरलेले सारे दागदागिने खजिन्यात जमा करा."

"लगेच जमा करतो! लगेच!" सरदार म्हणाला.





रात्र सरण्याआधी चाळीस चोर दागिने आणि जवाहिऱ्यांनी भरलेल्या चाळीस तिजोऱ्या घेऊन बादशहाच्या खजिन्यात गेले.

पुढच्या सकाळी अहमद बादशहासमोर हजर झाला. “शहेनशहा, माझी अद्भूत शक्ती खजिना आणि चोर यांतील एकच गोष्ट शोधू शकते, दोन्ही नाही. कुठली शोधू?” “खजिना,” बादशहा म्हणाला, “खरंतर चोरसुद्धा सापडले पाहिजे होते. त्यांना शिक्षा द्यायला तेल उकळत ठेवलं होतं. पण हरकत नाही. बरं, खजिना कुठाय ते सांग. मी माझे शिपाई पाठवतो लगेच तो आणायला.”

‘त्याची काही गरज नाही, बादशहा सलामत,” अहमद हात हवेत हलवत मोठ्याने म्हणाला. “पिश-पॉश, विश-वॉश, मिश-मॉश.”

मग तो म्हणाला, “माझ्या अद्भूत शक्तींनी तिजोऱ्या खजिन्यात पोहोचवल्या आहेत.”





बादशहा स्वतः अहमदसोबत खजिन्यात गेला. तिजोऱ्या खजिन्यात होत्या. “खरंच तुम्ही या युगातले एक महान ज्योतिषी आहात,” त्याने घोषणा केली, “आजपासून तुम्ही माझे राजज्योतिषी आहात.”

“आभारी आहे, शहेनशहा,” अहमद झुकून म्हणाला, “पण दुर्दैवाने हे अशक्य आहे. तुमचा खजिना शोधणं आणि परत आणणं हे खूप कठीण काम होतं. यात माझी बरीच अद्भूत शक्ती खर्च झालीय. आता पुन्हा मी कुठली भविष्यवाणी करू शकणार नाही.”

“केवढं नुकसान झालं तुमचं!” बादशहा ओरडला. “खरं तर तुम्हांला दुप्पट इनाम द्यायला हवं. या खजिन्यातल्या दोन तिजोऱ्या निवडून घेऊन जा.”

अशा प्रकारे अहमद जमैलकडे सुरक्षित परतला. आता तो खूप श्रीमंत झाला होता आणि सूज्ञसुद्धा! कुणीही ज्योतिषी सांगू शकला असता की त्याने उर्वरीत आयुष्य मोठ्या सुखासमाधानात व्यतीत केले.



समाप्त